# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः14.04.2025** **वारःसोमवार**

---

1. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त देशभरात आज विविध कार्यक्रमांचं आयोजन
2. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज हरियाणामधल्या अनेक प्रकल्पांचं उद्घाटन
3. लेझर-आधारित शस्त्र प्रणालीची भारताकडून यशस्वी चाचणी
4. सहकार क्षेत्रात परिवर्तनकारी बदल-केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शहा यांचं प्रतिपादन
5. पुथांडू म्हणजेच तमिळ नव वर्षाची आणि विशु या केरळवासीयांच्या नव वर्षाची आजपासून सुरुवात
6. आरडीएक्स असलेली स्फोटकं बाळगल्याप्रकरणी दोन जणांना अटक- पंजाब पोलिसांची कारवाई आणि
7. आयपीएल क्रिकेट स्पर्धेत कालच्या सामन्यांमध्ये मुंबई इंडियन्स आणि रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरू विजयी

**<u>आंबेडकर जयंती</u>**

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची आज 134वी जयंती आहे. या निमित्त संपूर्ण देशभरात विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात येत आहे. डॉक्टर आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी देशवासियांना शुभेच्छा दिल्या आहेत. डॉक्टर आंबेडकर हे विलक्षण क्षमता असलेले बहुआयामी व्यक्तिमत्व होते, अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही असाधारण कार्य करून त्यांनी जगभरात आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली. महिला आणि वंचित वर्गाच्या आर्थिक आणि सामाजिक हक्कांसाठी आयुष्यभर संघर्ष करणाऱ्या डॉक्टर आंबेडकर यांचं जीवन कार्य प्रेरणादायी आहे, असं राष्ट्रपतींनी आपल्या शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड, पंतप्रधान नरेंद्र मोदी, लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला, मंत्री, खासदार आणि इतर मान्यवर आज सकाळी संसद भवन संकुलातल्या बाबासाहेबांच्या पुतळ्याला पुष्पांजली अर्पण करतील. डॉक्टर आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त त्यांना अभिवादन करण्यासाठी दादरच्या चैत्यभूमीवर, तसंच नागपूरमध्ये दीक्षाभूमीवर हजारो अनुयायी दाखल झाले आहेत. त्यांच्या सोयी-सुविधेसाठी प्रशासनानं जय्यत तयारी केली आहे.

**<u>पंतप्रधान</u>**

डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी आज हरियाणामधल्या अनेक प्रकल्पांचं उद्घाटन करणार आहेत. पंतप्रधान हिसार ते अयोध्या या व्यावसायिक विमान उड्डाणा सेवेला हिरवा झेंडा दाखवतील आणि हिसार विमानतळाच्या नवीन टर्मिनल इमारतीची पायाभरणी करतील. तर यमुनानगरमध्ये, 800 मेगावॅट वीज युनिट क्षमतेच्या दीनबंधू छोटू राम औष्णिक वीज प्रकल्पाचं, तसंच मुकरबपूरमधला कॉम्प्रेस्ड बायोगॅस प्रकल्प आणि भारतमाला प्रकल्पांतर्गत 14 किमीपेक्षा जास्त लांबीच्या रेवाडी बायपास प्रकल्पाचं उद्घाटन आणि पायाभरणी आज पंतप्रधानांच्या हस्ते होणार आहे.

**<u>शस्त्रप्रणाली</u>**

भारतानं पहिल्यांदाच 30 किलोवॅट क्षमतेच्या लेझर-आधारित शस्त्र प्रणालीचा वापर करून फिक्स्ड-विंग विमानं, क्षेपणास्त्रे आणि स्वार्म ड्रोन पाडण्याची क्षमता दाखवली आहे. यामुळं अशी शस्त्र प्रणाली क्षमता असलेल्या अमेरिका, चीन आणि रशियासह

निवडक देशांच्या यादीत भारताचा समावेश झाला आहे. संरक्षण संशोधन आणि विकास संघटना अर्थात डीआरडीओच्या हैदराबाद इथल्या सेंटर फॉर हाय एनर्जी सिस्टम्स अँड सायन्सेसनं काल आंध्र प्रदेशातल्या कुर्नूल इथं या नवीन शस्त्र प्रणालीची यशस्वी चाचणी केली.

**<u>सहकारमंत्री</u>**

केंद्र सरकारनं सहकार मंत्रालयाची स्थापना केल्यापासून देशातल्या सहकार क्षेत्रात झालेल्या परिवर्तनकारी बदलांचं केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शहा यांनी कौतुक केलं आहे. ते काल भोपाळ इथं झालेल्या राज्यस्तरीय सहकारी परिषदेला संबोधित करताना बोलत होते. देशाच्या इतिहासात पहिल्यांदाच एकात्मिक दृष्टिकोनातून ग्रामीण विकास, शेती आणि पशुपालन यांना सरकारनं सहकाराच्या माध्यमातून कसं एकत्रित केलं याविषयीसुद्धा शाह यांनी सांगितलं.

**<u>पश्चिम बंगाल</u>**

पश्चिम बंगालमध्ये, वक्फ सुधारणा कायदा कायद्याच्या निषेधार्थ झालेल्या हिंसक आंदोलना संदर्भात आणखी बारा जणांना अटक करण्यात आली आहे, यामुळं आतापर्यंत अटक झालेल्यांची एकूण संख्या दिडशे (150) झाली आहे. मुर्शिदाबाद जिल्ह्यातून कोणत्याही ठिकाणी हिंसाचाराची कोणतीही नवीन घटना काल घडल्याचं वृत्त नाही नाही, सुरक्षा दलांनी कडक पहारा ठेवला आहे. स्थानिक प्रशासनानं हिंसाचारग्रस्त कुटुंबांसाठी निवास आणि जेवणाची व्यवस्था केली आहे. कोलकाता उच्च न्यायालयानं केंद्रीय दलांना तात्काळ हस्तक्षेप करण्याचे आदेश दिल्यानंतर बीएसएफ तैनात करण्याचा निर्णय घेण्यात आला. पश्चिम बंगालचे राज्यपाल डॉ. सी. व्ही. आनंद बोस यांनी न्यायालयाच्या या निर्णयाचे स्वागत केलं आहे.

**<u>पंजाब स्फोटके</u>**

पंजाबमधल्या फिरोजपूर इथून राज्य पोलिसांच्या गुप्तहेर यंत्रणा विभागानं दोन जणांना अटक केली असून त्यांच्याकडून आरडीएक्स असलेली आयईडी स्फोटके जप्त करण्यात आली. या दोघांनी जर्मनीस्थित दहशतवादी गोल्डी ढिल्लनच्या सांगण्यावरून ही स्फोटके त्यांच्या एका सहकाऱ्याला पोहोचवणार होते. राष्ट्रीय तपास यंत्रणा अर्थात एनआयएनं ढिल्लनवर 10 लाख रुपयांचं बक्षीस जाहीर केलं आहे.

**<u>तमिळ नववर्ष</u>**

जगभरातल्या तमिळ भाषिक समुदायाच्या पुथांडू या तमिळ नवीन वर्षाची सुरुवात आज होत आहे. तमिळ महिन्याच्या चिथिराईच्या पहिल्या दिवशी पुथांडू साजरा केला जातो. या सणानिमित्त मंदिरांमधून धार्मिक कार्यक्रमाचं आयोजन करण्यात येतं, तसंच घरोघरी इडली वडा पायसमसह चविष्ट पारंपारिक पदार्थांची आज रेलचेल असते.

**<u>विशु-केरळ नववर्ष</u>**

आज जगभरातील केरळवासी पारंपारिक नवीन वर्ष विशु साजरं करत आहेत. विशु म्हणजे विपुलता आणि नवीन सुरुवातीचे प्रतीक असून या शुभ दिवशी भगवान श्रीकृष्णाची पूजा केली जाते. भगवान श्रीकृष्णाची कानी कोन्नाची फुले, कानी वेलारी, फळे, भाज्या, सोने, नाणी इत्यादींनी पूजा केली जाते. गुरुवायूर, श्री पद्मनाभस्वामी मंदिर, सबरीमाला इत्यादी प्रमुख मंदिरांमध्ये आज 'विशु कानी' आणि विशेष विधी आयोजित केले जात आहेत, तसंच सकाळपासूनच मोठ्या संख्येने भाविक गर्दी करत आहेत.

**<u>अंमली पदार्थ-मिझोरम</u>**

महसूल गुप्तचर संचालनालयानं मिझोरम राज्याच्या सीमेवर 52 किलोग्राम मेथाम्फेटामाइन जप्त केले असून या प्रकरणी दोघांना अटक करण्यात आली आहे. या अंमलीपदार्थांची किंमत 52 कोटी रुपयांपेक्षा जास्त आहे. या कारवाईमध्ये तस्करी केलेले अंमली पदार्थ लपवण्याची करण्याची एक नवीन पद्धत उघडकीस आली आहे. या कारवाईत ट्रकच्या ताडपत्रीच्या कव्हरच्या पटांमध्ये बारकाईने पॅक केलेले, विटांच्या आकाराचे लपवलेले सुमारे 53 बारकाईने पॅकेट आढळले.

**मिझोरम- पामसंडे**

मिझोरम राज्याच्या सर्व भागात काल पाम संडे धार्मिक वातावरणात पाळण्यात आला. याला मिझोमध्ये 'तुमकौ नी' म्हणून ओळखले जातं. पाम संडेचं महत्त्व दर्शविताना, मोठ्या संख्येनं श्रद्धावानांनी 'होसन्ना' चा जयघोष करत मिरवणुका काढल्या, ज्यामध्ये लोकांनी ख्रिश्चन धर्माच्या भावनेचे प्रतीक असलेल्या ताडाची पानं धरली होती. मिझोरमच्या राज्याच्या सर्व चर्चमध्ये पाम संडे सेवा आयोजित करण्यात आल्या होत्या.

**विदेशी गुंतवणूक**

गेल्या आर्थिक वर्षात डिसेंबर अखेर देशातल्या औषध आणि वैद्यकीय उपकरण निर्मिती क्षेत्रात 11 हजार 888 कोटी रुपयांची थेट परकीय गुंतवणूक झाली आहे. याशिवाय ब्राउनफिल्ड प्रकल्पांमधल्या 7 हजार 246 की 40 लाख रुपयांच्या विदेशी गुंतवणूक प्रस्तावांना मान्यता देण्यात आली आहे. यामुळे या क्षेत्रातली एकूण विदेशी गुंतवणूक 19 हजार 134 कोटी 40 रुपये झाली असल्याची माहिती औषधनिर्माण विभागानं दिली आहे. सरकारच्या उत्पादन संलग्न प्रोत्साहन योजनेमुळे देशांतर्गत औषध उत्पादनाला चालना मिळाली असून परकीय गुंतवणुकीचा ओघही वाढला आहे. तसंच आयात कमी होऊन निर्यात वाढल्याचं विभागानं दिलेल्या निवेदनात म्हटलं आहे.

**हल्ला**

युक्रेनमधील सुमी या शहराच्या मध्यभागी काल रशियन क्षेपणास्त्रांच्या हल्ल्यात दोन मुलांसह किमान 32 जणांचा मृत्यू झाला असून 84 जण जखमी झाले आहेत. 2023 नंतर युक्रेनियन नागरिकांवर झालेला हा सर्वात घातक हल्ला ठरला आहे. पाम संडेनिमित्त चर्चमधील सेवांमध्ये अनेक लोक सहभागी होत असताना हा हल्ला झाला. राष्ट्रपती व्होलोडिमिर झेलेन्स्की यांनी या हल्ल्याला दहशतवादी कृत्य म्हटलं असून याच्या निषेधार्थ जगातील सर्व देशांनी तीव्र प्रतिसाद देण्याचं आवाहन केलं आहे.

**परराष्ट्रमंत्री**

जर्मनीचं राज्य बव्हेरियाचे मंत्री मार्कस सोडर यांनी काल नवी दिल्लीत परराष्ट्र मंत्री डॉ. एस. जयशंकर यांची भेट घेतली. त्यांनी जर्मनी आणि युरोपियन युनियनसोबत भारताचं सहकार्य मजबूत करण्यात बव्हेरियाच्या योगदानाबाबत यावेळी चर्चा केली. युरोपियन विकास, ट्रान्स-अटलांटिक संबंध आणि इंडो-पॅसिफिक यावरही डॉ. जयशंकर आणि सोडर यांनी सविस्तर चर्चा केली.

**क्रिकेट**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत काल रात्री दिल्लीतल्या अरुण जेटली स्टेडियमवर झालेल्या सामन्यात मुंबई इंडियन्सनं दिल्ली कॅपिटल्सचा 12 धावांनी पराभव केला. तर जयपूरमधल्या सवाई मानसिंग स्टेडियमवर झालेल्या दुसऱ्या सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरूनं राजस्थान रॉयल्सचा 9 गडी राखून पराभव केला.

# या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं

# नमस्कार.